संपादकीय
राकेश शंकर गोरे

# मणिपूर : संघर्षाची धग अन् उपेक्षेची सल



पश्चिम हिंसाचाराच्या ताज्या घटनांमुळे लक्ष वेधून घेणारे मणिपूर आणखी एका घटनेमुळे नुकतेच चर्चेत आले होते. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी त्यांच्या भारत जोडो न्याय यात्रेची सुरुवात करण्यासाठी मणिपूरचीच निवड केली. त्यामुळे बऱ्याच महिन्यांनी मणिपूरच्या जनतेने हिंसाचार, बंद, पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त याशिवाय वेगळे, राजकीय वातावरण अनुभवले. माणिपूरमध्ये गेल्या वर्षीच्या मे महिन्यापासून, म्हणजे नऊ महिन्यांपासून संघर्ष सुरू आहे. संघर्षाची केंद्रे निवडक असली तरी परिणाम व्यापक आहेत. त्यामुळे हा संघर्ष तातडीने आणि नागरिकांना विश्वासात घेऊनच सोडवणे आवश्यक आहे. देशात लोकसभा निवडणुकीचे वातावरण तापण्यास सुरुवात झाली आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरही मणिपूरमधल्या परिस्थितीकडे पाहायला हवे. मणिपूरमध्ये काँग्रेस आणि भाजप या दोन्ही राजकीय पक्षांचे चांगलेच अस्तित्व आहे. सध्याचे सरकार भाजपचे असून ही त्यांची दुसरी टर्म आहे. त्याआधी सलग तीन वेळा आणि त्याहीआधी बऱ्याच वेळा काँग्रेसचे सरकार होते. पण तरीही, राष्ट्रीय राजकारणात मणिपूरला महत्त्व मिळालेले नाही. कदाचित या राज्याकडे पाहिले की या दोन्ही पक्षांना - राज्यसभेची एक जागा आणि लोकसभेच्या दोन, एवढेच दिसत असावे. दिल्लीकडून आलेली कोणत्याही प्रकारची राजकीय लाट ईशान्येतल्या दऱ्याखोऱ्यांत विरून जाते. प्रचंड हिंसाचार होऊनही पंतप्रधानांचे या प्रश्नावरचे मौन आणि यात्रेसाठी जाणीवपूर्वक मणिपूरची निवड करूनही राहुल गांधी यांना मूळ प्रश्नापेक्षा 'मोदी इकडे आलेच नाहीत' या एकाच मुद्द्यावर भर द्यावासा वाटणे, यातूनच या दोन्ही पक्षांची मणिपूरच्या संघर्षाबाबतची चिंता दिसून येते. दोन राष्ट्रीय पक्ष असूनही या राज्याचे प्रश्न सुटत नसतील, तर हे या दोन्ही पक्षांचे अपयश आहे.

आर्थिक फटका

राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ५१ टक्के असलेल्या मैतेई आणि ४० टक्के लोकसंख्या कुकी या आदिवासी समुदायात नऊ महिन्यांपासून वाद चिघळलेला आहे. बहुसंख्य आणि राजकारणात वर्चस्व असलेल्या मैतेई समुदायाला 'आदिवासी' हा दर्जा देण्याच्या आणि त्या माध्यमातून आरक्षणाचे लाभ देण्याच्या न्यायालयाच्या निर्णयाला विरोध म्हणून सुरू झालेल्या आंदोलनाला हिंसक वळण लागून आत्तापर्यंत झालेल्या संघर्षात १८० हून अधिक जणांचा मृत्यू झाला आहे. सातत्याने संचारबंदी, बंद, इंटरनेट बंद असल्यामुळे छोट्या मोठ्या व्यावसायिकांचा अक्षरशः बाजार उठला आहे. जे फळविक्रते महिन्याकाठी ४०-४५ हजारांचा व्यवसाय करत होते, त्यांच्या हातात कसेबसे ४-५ हजार पडत आहेत. महागाईत साडेअकरा टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. बहुतांश मणिपूर शांतच आहे, असे सरकार सांगत असले तरी वातावरणाचा पर्यटकांच्या संख्येवरही परिणाम झाला आहेच. जी-२० च्या बैठका झाल्यानं पर्यटकसंख्येत वाढ होण्याची आशा निर्माण झाली असतानाच संघर्ष निर्माण झाला आणि आधीच्या वर्षी असलेली एक लाख साठ हजार ही पर्यटकसंख्या थेट वीस हजारांवरच आली आहे.

म्यानमारमधून होणारी घुसखोरी

राज्यातल्या हिंसाचारात शेकडो घरे, दुकाने आणि प्रार्थनास्थळे जाळली गेल्यामुळे हजारो जण बेघर होऊन त्यांना आसाम, मेघालय आणि मिझोराम या शेजारच्या राज्यांमध्ये आश्रय घ्यावा लागला आहे. त्याचवेळी मणिपूरच्या पलिकडे असलेल्या म्यानमारमधून मात्र तिकडच्या सशस्त्र गटांमधल्या काही टोळ्या आणि नागरिक व सैनिकही मणिपूरमध्ये आले आहेत. नागरिक व सैनिकांना माघारी पाठवले जात असले तरी सशस्त्र गटांची कुकींशी वांशिक जवळीक असल्याने त्यांना गुप्तपणे आश्रय दिला जात असल्याचा मैतेईंचा आरोप आहे. या घुसखोरांनी एका ग्रामरक्षकाची केलेली हत्या, हेच चार दिवसांपूर्वी हिंसाचार उसळण्याचे कारण होते. त्यामुळेच, म्यानमारबरोबर २०१८ मध्ये केलेला मुक्तसंचार करार रद्द करण्याचा भारत सरकार विचार करत आहे. सीमाभागातील लोकांचे समान सांस्कृतिक बंध असल्यानं व्यापाराला चालना देण्यासाठी हा करार करण्यात आला आहे. मात्र, अमली पदार्थांची तस्करी, घुसखोरी आणि म्यानमारमधील सशस्त्र गटांना लपण्याची सोय यासाठीच त्याचा अधिक वापर होत असल्याचे सरकारच्या लक्षात आले आहे. दुर्लक्षित केले गेल्याची भावना ईशान्येतल्या नागरिकांमध्ये आहे. ती दूर करण्याचे प्रयत्न होणे आवश्यक असताना त्यांच्या प्रश्नांवर, वेदनेवर मौनमुद्रा धारण करणे किंवा तात्पुरती 'मोहब्बत' दाखवणे, यातून ते आणखीनच दुखावले जातात. संघर्षामुळे सीमेवरील या अत्यंत महत्त्वाच्या राज्याचा आर्थिक गाड्याचे चाक रुतले असताना त्याकडे दुर्लक्ष करणे 'लुक ईस्ट' किंवा 'ॲक्ट ईस्ट' धोरणाच्या कोणत्या तरतुदीत बसते?

# SUPERFOOD APRICOT : KNOW THESE AMAZING BENEFITS OF KHUBANI



Apricots, also known as Khubani, are small, round, and golden-coloured fruits that are a part of the Prunus family. They have a deliciously sweet and tangy taste and are commonly found in the Middle East, Asia, and parts of Europe. While apricots are often eaten as a snack, what many people may not know is that they are considered a superfood due to their numerous health benefits. In this article, we will explore the amazing benefits of Khubani or apricot and why it should be a staple in your diet.

**Rich in Nutrients :** Apricots are packed with essential vitamins and minerals that are vital for our overall health. They are a great source of vitamins A, C, E, and K, along with important minerals such as potassium, iron, and calcium. These nutrients help boost our immune system, maintain healthy bone density, and keep our skin and hair looking healthy and radiant.

**Good for Eye Health :** Apricots contain high levels of beta-carotene, which is converted into Vitamin A in our bodies. Vitamin A is essential for maintaining good eyesight and preventing age-related eye diseases such as cataracts and macular degeneration. Including apricots in your diet can help improve your eye health and keep your vision sharp.

**Promotes Digestive Health :** Apricots are an excellent source of dietary fibre, which is essential for maintaining a healthy digestive system. A cup of apricots contains around 3 grams of fibre, which can help prevent constipation and promote regular bowel movements. Fibre also helps keep our gut bacteria healthy, which is crucial for overall digestive health.

**Boosts Heart Health :** Apricots are known to be heart-healthy fruits due to their high potassium content. Potassium is a mineral that helps regulate blood pressure and maintain a healthy heartbeat. It also plays a role in reducing the risk of stroke and other cardiovascular diseases. Including apricots in your diet can help keep your heart healthy and strong.

**Good for Skin Health :** Apricots are a rich source of Vitamin C, which is essential for maintaining healthy and glowing skin. Vitamin C helps in collagen production, which is responsible for keeping our skin firm and youthful. It also has antioxidant properties that can help protect our skin from damage caused by UV rays and pollution, making apricots a great addition to your skincare routine.

# कांद्याच पाणी पिण्याचे जबरदस्त आरोग्यदायी फायदे



बदलत्या हवामानात अनेकांना सर्दी, खोकल्यासारख्या समस्यांना सामोरे जावे लागते. याचे मुख्य कारण म्हणजे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होणे. जर तुमची प्रतिकारशक्ती खूप कमकुवत असेल तर त्यामुळे सर्दी आणि संसर्गासारख्या समस्या खूप गंभीर होऊ शकतात. अशा परिस्थितीत, कमकुवत प्रतिकारशक्ती वाढवणे खूप महत्वाचे आहे. प्रतिकारशक्ती फार कमी होते अशावेळी ती वाढवायची असेल तर कांद्याचे पाणी प्या. या पाण्याचे सेवन केल्याने तुमची कमकुवत रोगप्रतिकारक शक्ती वाढू शकते. त्यात अनेक शक्तिशाली अँटिऑक्सिडंट असतात, जे कमकुवत प्रतिकारशक्ती वाढवू शकतात. तसेच शरीरातील बॅक्टेरियाची वाढ रोखू शकते. आज या लेखातून आपण कांद्याच्या रसाचे सेवन केल्याच्या आरोग्यदायी फायद्यांविषयी सांगणार आहोत.

**सर्दी-खोकल्यापासून सुटका**

कांद्याचे पाणी प्यायल्याने सर्दी-खोकल्याची समस्या दूर होते. वास्तविक, या रसामध्ये बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ गुणधर्म असतो, ज्यामुळे शरीरातील जळजळ कमी होते. याशिवाय, ते तुमच्या शरीराला संसर्गापासून दूर ठेवू शकते. बदलत्या हवामानामुळे सर्दी-खोकल्याच्या समस्येपासून मुक्ती मिळवायची असेल तर याचे सेवन जरूर करा.

**शरीराची सूज कमी करा**

शरीरातील सूज कमी करण्यासाठी कांद्याचा रस सेवन करणे खूप आरोग्यदायी असू शकते. यात दाहक-विरोधी गुणधर्म आहेत, ज्यामुळे शरीरातील सूज कमी होऊ शकते. याशिवाय, सांधेदुखीमुळे होणाऱ्या वेदनांपासूनही आराम मिळू शकतो. जर तुम्हाला संधिवात किंवा इतर कोणत्याही कारणामुळे सूज येत असेल तर कांद्याचे पाणी जरूर प्या.

**श्लेष्मा आराम**

छातीत श्लेष्मा जमा झाल्यामुळे अनेक प्रकारच्या समस्या उद्भवू शकतात. या समस्येवर मात करण्यासाठी कांद्याचे पाणी पिणे खूप आरोग्यदायी ठरू शकते. यामुळे छातीत जमा झालेला कफ बाहेर टाकता येतो. खोकला आणि सर्दीच्या लक्षणांपासून देखील आराम मिळू शकतो.

**प्रतिकारशक्ती वाढवा**

कांद्याच्या रसाच्या पाण्यात अनेक आवश्यक पोषक घटक असतात. ज्यात फोलेट, लोह, कॅल्शियम यांसारखे पोषक घटक असतात. या पोषक तत्वांच्या मदतीने तुमच्या शरीराची कमकुवत रोगप्रतिकारक शक्ती वाढवता येते. तसेच ते संसर्गापासून दूर राहू शकते. इन्फेक्शनची समस्या दूर ठेवायची असेल तर याचे सेवन जरूर करा.

**कांद्याचे पाणी कसे घ्यावे**

कांद्याचे पाणी पिण्यासाठी, प्रथम एक कांदा नीट किसून घ्या, नंतर त्यात एक ग्लास पाणी घाला आणि रात्रभर सोडा. या पाण्यात थोडेसे मध मिसळून सकाळी सेवन करा. याचा तुमच्या एकूण शरीराला खूप फायदा होऊ शकतो.

# अर्जुन अन् सायलीचं 'फ्रेंडमून' माथेरानमध्ये..



मराठी 'स्टार प्रवाह' वरील सध्याची टॉपची मालिका 'ठरलं तर मग' मध्ये सायली आणि अर्जुनचा हनिमून सिक्वेन्स पाहायला मिळणार आहे. दोघांनीही कुठेतरी फिरायला जावं अशी अर्जुनच्या आईची इच्छा असते. शेवटी त्यांचा माथेरानचा प्लॅन ठरतो. सायली आणि अर्जुनचे माथेरानमधील फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. दोघांची जोडी प्रेक्षकांच्या अतिशय लाडकी आहे. त्यामुळे आता त्यांच्या हनिमूनच्या फोटोवरही चाहते लाईक्सचा वर्षाव करत आहेत. सायली आणि अर्जुन हनिमूनसाठी माथेरानला गेले आहेत. दोघांचा गुलाबी आऊटफिट असून तिथलं वातावरणही गुलाबी झालेलं दिसत आहे. सायलीने घोड्यावर बसण्याचा आनंदही लुटलेला दिसत आहे. तर अर्जुन डोक्यावर टोपी आणि गळ्यात मफलर अशा कूल लूकमध्ये दिसत आहे. माथेरान येथील सेल्फी पॉईंटवर त्यांचा सेल्फी घेतानाचा फोटोही व्हायरल होतोय. माथेरानच्या थंड वातावरणात जुई गडकरी आणि अमित भानुशाली मालिकेच्या शूटिंगचा आनंद घेत आहेत.

# 'वर्षानुवर्षांचं स्वप्न जेव्हा पूर्ण होतं तेव्हा ते..'; राम मंदिरासंबंधि प्रथमेश परब म्हणतो..



अयोध्येतील श्रीराम मंदिरात रामलल्लाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते संपन्न झाली. 500 वर्षांच्या प्रतीक्षेनंतर सोमवारी भगवान श्रीराम त्यांच्या भव्यदिव्य मंदिरात विराजमान झाले आहेत.त्यामुळे संपूर्ण देशभरात आनंदाचे, उत्साहाचे वातावरण आहे. या सोहळ्यानंतर अनेकांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांचा आनंद व्यक्त केला. यात अभिनेता प्रथमेश परब यानेही इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. 'वर्षानुवर्षांचं स्वप्न जेव्हा पूर्ण होतं तेव्हा ते 'राम मंदिरासारखं' दिसतं,' असं कॅप्शन देत प्रथमेश परबने श्रीरामाचा फोटो शेअर केला आहे. दरम्यान, प्रथमेशसह अनेक कलाकारांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांचा आनंद व्यक्त केला आहे.

# 'यापासून कायम लांब पळत गेलो...', सिद्धार्थ चांदेकरने सांगितले 'त्या' गोष्टीबद्दल



अभिनेत्री सिद्धार्थ चांदेकर मराठी सिनेइंडस्ट्रीतला प्रसिद्ध अभिनेता आहे. त्याने विविध भूमिका साकारुन रसिकांच्या मनात घर केले आहे. तो लवकरच श्रीदेवी प्रसन्न चित्रपटात पाहायला मिळणार आहे. यात तो सई ताम्हणकरसोबत झळकणार आहे. नुकतेच त्याने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे, जी चर्चेत आली आहे. सिद्धार्थ चांदेकर याने इंस्टाग्रामवर श्रीदेवी प्रसन्न चित्रपटातील फोटो शेअर करत लिहिले की, तुमच्या भीतीवर मात करण्यासाठी पहिले पाऊल. नाच ह्या गोष्टीपासून कायम लांब पळत गेलो. कधीच जमणार नाही असं वाटायचं. आता कुठे जरा आत्मविश्वास आला आहे. आता पळणार नाही. खूप नाचणार. ही संधी दिल्याबद्दल टीप्स मराठीचे आभार मानतो. माझ्यातील बेस्ट पप्पू मलूने बाहेर काढले.

## HEALTH AND SPORTS

### 'YASHASVI JAISWAL COULD ESTABLISH HIMSELF IN TEST SIDE DURING ENGLAND SERIES': GAVASKAR



**NEW DELHI:** Young opener Yashasvi Jaiswal could cement his place in the Indian Test side during the upcoming five-match IND vs ENG Test series at home, feels the legendary Sunil Gavaskar. The former captain believes that the Indian pitches would allow the 20-year-old to express himself in a better manner than the hard and bouncy tracks of South Africa. India last played a Test series in South Africa. "The home pitches would be different. The pitches in South Africa were tough due to extra bounce, and even experienced batters struggle, whereas Yashasvi is a youngster," Gavaskar told Star Sports. "However, with the approach that he displayed in Centurion and even in the West Indies, there's a belief that he would cement himself on the Indian tracks. You need a left-hander in the top order. Although I cannot say it with all certainty, he is likely to cement himself in the Test side in this series." Since his debut in the longest format last year in the West Indies, Jaiswal has scored 316 runs in seven Test innings at an average of 45.14, including a hundred and a half-century. However, during the South Africa tour earlier this year, he could manage only 50 runs in four innings. Former India seamer Irfan Pathan has termed the No. 3 batting slot for Shubman Gill as a great responsibility, besides asserting that he will cherish it forever. Gill came up with a poor performance at No.3 in South Africa, managing just 74 runs in four innings. However, Pathan believes that Gill is in the right zone with the correct mindset, and he should do well on the Indian pitches. "It's a great role for him (to bat at no.3), and he will cherish it for the rest of his life. The comfort he showed in the South African pitches, he appears to be in the right zone.

### SURYAKUMAR YADAV NAMED CAPTAIN AS ICC ANNOUNCES T20I TEAM OF THE YEAR FOR 2023; 4 TEAM INDIA STARS MAKE THE CUT



**NEW DELHI :** Four Indians have made the cut as the International Cricket Council (ICC) announced the Men's T20I Team of the Year for the 2023 season on Monday. Top-ranked batter Suryakumar Yadav spearheaded the star-studded lineup revealed by the global cricket administrative body in the T20 World Cup year. Premier batter Suryakumar recently captained the Indian team in the absence of skipper Rohit Sharma and his former deputy Hardik Pandya. Under the leadership of Suryakumar, India played two T20I series against Australia and South Africa after the One Day International (ODI) World Cup. Nicknamed SKY, the explosive batter retained the top spot in last year's ICC Men's T20I batting rankings. Each year, the ICC recognises 11 outstanding individuals who earned plaudits for their remarkable performances in the shortest format. Players who stood out throughout the 2023 season have been nominated in the ICC Men's T20I Team of the Year. ICC picked Suryakumar as the captain of the men's T20I team of the year after the star batter capped off a stellar 2023 season in the shortest format. Surya kicked off the previous season with a score of seven against Sri Lanka before notching up scores of 51 (36) and 112* (51) in the next two T20Is. The top-ranked batter showcased his consistency by regularly scoring in the 20s to 40s for India. He also smashed half-centuries against Australia (80 off 42 balls) and South Africa (56 from 36 balls). In the final T20I of the year at Johannesburg, India's stand-in skipper registered a stunning century off 56 balls against South Africa.

### 'ROHIT HAS TO WORK IT OUT WITH RAHUL DRAVID...': ZAHEER KHAN ON CHALLENGES FOR IND CAPTAIN IN 5-TEST SERIES VS ENG



**NEW DELHI :** Rohit Sharma led India to a historic series draw in South Africa earlier this year and his next big challenge as Test captain is to maintain his side's hegemony at home in the upcoming five-match series against England. India are on a record run of 16 series unbeaten at home in Test cricket, with the next best being Australia's run of 10 between 1994 and 2000 and 2004 and 2008. However, they are facing an England side who have not lost a Test series since Ben Stokes took over as captain and Brendon McCullum as head coach in June 2022. Rohit was famously unable to convert the incredible success he enjoyed in limited overs cricket to the longest format for a large part of his career until he was made India's opener in 2019. Since then, he has established himself as one of the best Test openers in the world and former India fast bowler Zaheer Khan feels that he will have a big role to play in that position during the series against England. "Since the time Rohit has been an opener in Tests, he's scored some brilliant hundreds in the toughest of conditions. You've seen him adapt nicely in England when it came to leaving the ball. He said that he had worked a lot on it," said Zaheer on Star Sports. He also pointed out Rohit's knock of 161 off 231 balls in the first innings of India's second Test against England in Chennai in February 2021 on a difficult pitch. "You've seen that in Chennai when he played a match-defining knock. Winning the toss, batting first and getting the opposition completely out in the first innings and being instrumental in that is something which gives satisfaction to any player, playing at the highest level," said Zaheer.

### 7 WAYS TO ADD PROTEIN TO YOUR DIET IN WINTER



Winter can take a toll on your body considering it has to work overtime to keep all the functions running. Inadequate nutrition, lack of hydration, sleep or high levels of stress can put you at risk of several illnesses. Tweaking your diet to include immunity boosting and seasonal foods can help you avoid infections, respiratory as well as heart trouble during this time. Protein intake can help you beat winter blues as the nutrient can help support our immune system and fight off infections. Protein-consumption can help in development of antibodies that can help ward off diseases. Protein can also help you keep warm and satiated during the cold weather when the cravings are on higher side. There are many ways you can include protein in your winter diet from soups, smoothies, wholegrain salads, eggs, chickpeas, and fish dishes. "As the winter chill sets in, maintaining a balanced and nutritious diet becomes crucial to support your immune system and overall well-being. Incorporating an ample amount of protein into your meals is particularly essential during this season to help your body stay strong and resilient," says Dr Archana Batra, Dietician, and a Certified Diabetes Educator. Batra suggests 7 delicious and warming ways to add protein to your diet in winter:

**WINTER-FRIENDLY PROTEIN DISHES TO INCLUDE IN YOUR DIET**

**1. Hearty soups and stews :** Embrace the warmth of a hearty soup or stew that not only satisfies your winter cravings but also packs a protein punch. Opt for recipes featuring lean proteins like chicken, turkey, or beans. A classic chicken noodle soup or a bean and vegetable stew can provide the comfort your body craves while boosting your protein intake.

**2. Quinoa salads :** Give your salads a winter makeover by incorporating protein-rich quinoa. Quinoa is a complete protein, offering all nine essential amino acids. Create a colourful salad with roasted winter vegetables, a handful of nuts, and a lemon vinaigrette for a wholesome and satisfying meal.

**3. Greek yoghurt parfaits :** Greek yoghurt is not only rich in protein but also a great source of probiotics for gut health. Create a winter-themed parfait by layering Greek yoghurt with seasonal fruits, nuts, and a drizzle of honey. This not only makes for a delicious breakfast or snack but also adds a protein boost to your diet.

**4. Egg-based breakfasts :** Eggs are a versatile and readily available source of high-quality protein. Incorporate eggs into your breakfast routine with options like omelettes, frittatas, or poached eggs on whole-grain toast. Adding spinach, mushrooms, and cheese can enhance both flavour and nutritional value.

**5. Warm protein smoothies :** While smoothies are often associated with warmer months, you can create a winter-friendly version by incorporating warm ingredients. Blend together ingredients like warm almond milk, protein powder, banana, and a dash of cinnamon for a comforting and protein-packed beverage.

**6. Roasted chickpeas** : Roasted chickpeas make for a crunchy and satisfying snack that's high in protein. Toss chickpeas with olive oil and your favourite spices, then roast them until crispy. They can be enjoyed on their own or added as a topping to salads or soups.

**7. Winter fish dishes :** Fish, such as salmon and trout, are excellent sources of protein and omega-3 fatty acids. Create heartwarming dishes like baked or grilled fish with winter herbs and citrus flavours. These not only add warmth to your meals but also contribute to your protein intake. Maintaining a protein-rich diet in winter can ensure your body receives the nutrients it needs to stay strong and resilient during the colder months..

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118
Office contact no. 022-26515151, Mob.9892386748 / 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com, Legal Adviser: Adv. Aniket Ghanshyam Bhankal, L.L.B., (ठाणे न्याय कक्षेत)

# अयोध्येतच नाही, तर महाराष्ट्रातील 'या' मंदिरात आहे श्रीरामाची कृष्णवर्णीय मूर्ती; मोदींनीही घेतले आहे दर्शन

■अयोध्या। प्रतिनिधी,

अयोध्यातील भव्य, ऐतिहासिक प्रभू श्रीराम मंदिरात आज अखेर रामाच्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडला. अनके वर्षांच्या प्रतीक्षेनंतर रामलल्ला आज मंदिरात विराजमान झाले. या भव्य मंदिरात प्रभू श्रीरामाच्या दर्शनासाठी दूरदूरवरून भाविक येत आहेत. रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या ऐतिहासिक क्षणाचे केवळ भारत देशच नव्हे, तर संपूर्ण जग साक्षीदार झाले आहे. अयोध्येच्या राम मंदिरात रामलल्लाच्या पाच वर्षांच्या बालस्वरूपाची मूर्ती बसवली आहे; जी काळ्या दगडापासून बनलेली आहे. पण तुम्हाला माहीत आहे का की, अयोध्येशिवाय नाशिकमधील एका मंदिरातही श्रीरामाची अशीच कृष्णवर्णीय मूर्ती आहे. काळाराम मंदिर, असे या मंदिराचे नाव आहे. चला जाणून घेऊ या मंदिराबद्दल



**काळाराम मंदिर का आहे खास?**

काळाराम मंदिराचे नाव देवाच्या कृष्णवर्णीय मूर्तीवरून घेण्यात आले आहे. कालांतराने याचे शाब्दिक भाषांतर काळा राम असे झाले. या मंदिराच्या गर्भगृहात भगवान श्रीरामाव्यतिरिक्त सीता व लक्ष्मण यांच्या मूर्ती आहेत. त्याचबरोबर मुख्य गेटवर भगवान हनुमानाची कृष्णवर्णीय मूर्ती आहे. श्री काळाराम मंदिर संस्थानाच्या वेबसाइटवरील महितीनुसार, हे मंदिर १७९२ मध्ये सरदार रंगाराव ओढेकर यांच्या प्रयत्नांतून बांधले गेले. असे म्हणतात की, सरदार ओढेकर यांना गोदावरीत रामाच्या कृष्णवर्णीय मूर्तींचे स्वप्न पडले होते. त्यानंतर त्यांनी या मूर्ती नदीतून बाहेर काढल्या आणि मंदिरात विराजमान केल्या. ज्या ठिकाणी मूर्ती सापडल्या, त्या ठिकाणाचे नाव रामकुंड असे होते. येथे श्रीरामाची दोन फुटी मूर्ती स्थापित आहे. हे मंदिर बांधण्यासाठी सुमारे १२ वर्षे लागली.

**मंदिरात सध्या आहेत १४ पायऱ्या**

श्री काळारामाच्या मुख्य मंदिराला १४ पायऱ्या आहेत. या पायऱ्या श्रीरामाच्या १४ वर्षांच्या वनवासाचे प्रतिनिधित्व करतात. त्याचबरोबर या मंदिरात ८४ खांब आहेत; जे ८४ लाख प्रजातींचे चक्र दर्शवतात. जो माणूस म्हणून जन्माला येण्यासाठी पूर्ण करावा लागतो, त्याशिवाय येथे एक खूप जुने झाड आहे. त्या झाडाखाली दगडावर भगवान दत्तात्रेयांच्या पावलांचे ठसे आहेत.

**पंचवटी विशेष का आहे?**

नाशिकचे पंचवटी हे विशेष स्थान आहे. कारण- आपल्या वनवासाच्या काळात भगवान श्रीरामांनी पंचवटीच्या दंडक जंगलात झोपडी बांधली होती आणि तेथे काही दिवस वास्तव्य केले होते, अशी आख्यायिका सांगितली जाते. येथे पाच वटवृक्ष आहेत. त्यामुळे याला पंचवटी म्हणतात. याच ठिकाणी लक्ष्मणजींनी शूर्पणखाचे नाक कापले होते. तसेच रावणाने माता सीतेचे अपहरण केले होते, असेही सांगितले जाते.

**काळाराम मंदिर कुठे आहे?**

नाशिकच्या पंचवटी तीर्थक्षेत्रात भगवान श्रीरामाचे मंदिर आहे. तुम्ही येथे बस, ट्रेन, विमानाने जाऊ शकता.

**काळाराम मंदिरात दर्शनाची वेळ**

काळाराम मंदिराला दररोज सकाळी ५ ते रात्री १० पर्यंत भेट देता येते.

## आत्महत्या करणाऱ्या तरुणाचा पोलिसांनी वाचविला जीव



■पुणे। प्रतिनिधी,

कौटुंबिक वादातून एका तरुणाने टोकाचे पाऊल उचलत आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मुंढवा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तरुणाला आत्महत्येपासून परावृत्त केले. घोरपडीतील बी. टी. कवडे रस्त्यावर रविवारी रात्री ही घटना घडली. घोरपडी परिसरातील निगडेनगर परिसरात एक तरुण आत्महत्या करत असल्याची माहिती पोलीस नियंत्रण कक्षाला रविवारी रात्री दहाच्या सुमारास मिळाली. गस्त घालणारे पोलीस कर्मचारी प्रवीण होळकर, जगदीश महानवर यांनी घटनास्थळी धाव घेतली.

होळकर आणि महानवर यांनी तरुणाला आत्महत्या करण्यापासून रोखले. त्याची विचारपूस करून धीर दिला. तेव्हा कौटुंबिक वादातून आत्महत्या करत असल्याचे तरुणाने पोलिसांनी सांगितले. त्यानंतर होळकर आणि महानवर यांनी मुंढवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश बाळकोटगी यांना या घटनेची माहिती दिली. बोळकोटगी यांनी तरुणाच्या नातेवाईकांशी संपर्क साधला. पोलीस निरीक्षक बोळकोटगी यांनी तरुणाशी संपर्क साधला. त्याला धीर देऊन आत्महत्या करण्यापासून परावृत्त केले. त्यानंतर पोलिसांनी त्याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करणार नाही, असे सांगितले. तरुणाने पोलिसांना लिखित स्वरुपात जबाब दिला.

## करोनाच्या नावावर मागितला 'पॅरोल', न्यायालय म्हणाले, 'आता कुठाय करोना...?



■नागपूर। प्रतिनिधी,

अमरावती कारागृहात बंदिस्त असलेल्या एका ५४ वर्षीय महिलेने कारागृह प्रशासनाकडे आपत्कालीन पॅरोलसाठी अर्ज केला. कारागृह प्रशासनाने पॅरोलचा अर्ज नाकारल्यावर महिलेने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली. उच्च न्यायालयाने, 'आता कसला करोना...' म्हणत कैदी महिलेची याचिका निकाली काढली. न्यायमूर्ती विनय जोशी आणि न्या. वृषाली जोशी यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.

संबंधित महिला अमरावती कारागृहात पॉक्सो कायद्याच्या अंतर्गत बंदिस्त आहे. महिलेने करोना विषाणूचे संसर्गाचे कारण पुढे करत आपात्कालीन पॅरोलासाठी अर्ज केला. मात्र पॉक्सो अंतर्गत येणाऱ्या कैद्यांना आपात्कालीन पॅरोलची परवानगी देता येत नसल्याने सांगत कारागृह प्रशासनाने महिलेचा अर्ज नामंजूर केला. यानंतर महिलेने उच्च न्यायालयात धाव घेतली.

मात्र उच्च न्यायालयानेही कारागृह प्रशासनाचा युक्तिवाद मान्य करत पॅरोलची मागणी फेटाळून लावली. महिलेने दिलेले करोनाचे कारणही उच्च न्यायालयाने फेटाळले. महिलेला आपात्कालीन पॅरोलऐवजी सामान्य पॅरोलसाठी अर्ज करण्याची सूचनाही न्यायालयाने केली.

महिला कैद्याच्यावतीने ॲड.एस.आर.जैस्वाल यांनी तर कारागृह प्रशासनाच्यावतीने ॲड.नंदिता त्रिपाठी यांनी युक्तिवाद केला.

## ठाण्यातील कोपीनेश्वर मंदीरात रामउत्सवाचा जल्लोष, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली महाआरती

■ठाणे। प्रतिनिधी,

राम मंदीरातील प्राणप्रतिष्ठा महासोहळ्याच्या पार्श्वभूमीवर ठाणे शहरातील कोपीनेश्वर या प्राचीन मंदिरात सोमवारी सकाळी शिवसेनेकडून आयोजित महाआरतीच्या निमित्ताने रामउत्सवाचा जल्लोष दिसून आला. याठिकाणी सकाळपासूनच रामभक्त पारंपारिक वेशात मोठ्या संख्येने जमले होते. ढोल-ताशे आणि बँजोच्या गजरात खांद्यावर श्रीरामाचे मफलर घेऊन भक्तांकडून रामाचा जयघोष सुरू होता. या उत्सवास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थिती लावून त्यांनीही जय श्रीरामाच्या घोषणा दिल्या आणि त्यास भक्तांनी प्रतिसाद दिल्याने परिसरातील वातावरण राममय झाले होते.



राम मंदीरातील प्राणप्रतिष्ठा महासोहळ्याच्या पार्श्वभूमीवर ठाणे शहरातील कोपीनेश्वर या प्राचीन मंदिरात शिवसेनेकडून महाआरतीचे आयोजन सोमवारी सकाळी करण्यात आले होते. गुढी पाडव्याच्या दिवशी कोपीनेश्वर मंदीर येथून मिरवणुक काढण्यात येते. त्यादिवशी मंदीरात जसे वातावरण असते, तसेच काहीसे वातावरण सोमवारी महाआरतीच्या निमित्ताने दिसून आले.

मंदीरात सर्वत्र फुलांची सजावट करण्यात आलेली होती. रांगोळ्या काढण्यात आलेल्या होत्या. आयोध्येतील राम मंदीर प्राणप्रतिष्ठा महासोहळा रामभक्तांना पहाता यावा, यासाठी मोठा पडदा लावण्यात आला होता. त्यावर आयोध्येतील कार्यक्रमाचे थेट प्रेक्षपण करण्यात येत होते.

सोमवार सकाळपासूनच कोपीनेश्वर मंदीरात रामभक्त पारंपारिक वेशभुषेत जमण्यास सुरूवात झाली. खांद्यावर श्रीरामाचे मफलर घेऊन भक्तांकडून रामाचा जयघोष सुरू होता. ढोल-ताशे आणि बँजोच्या तालावर अनेक भक्त थिरकत होते. महिला वर्गही मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## 'जय सियाराम'चा नारा, मंगलमय वातावरण अन् लाखो रामभक्तांची रथयात्रा!

■पिंपरी चिंचवड। प्रतिनिधी,

अत्यंत भक्तीमय आणि मंगलमय वातावरण, फुलांचा वर्षाव अन् ढोल-ताशांच्या निनादामध्ये चौकाचौकात होणारे स्वागत, फटाक्यांची तुफान आतिषबाजी आणि 'जय सियाराम'चा गगणभेदी नारा अशा उत्साहाच्या आणि भक्ती-भावाच्या वातावरणात तब्बल ५ लाखांहून अधिक पिंपरी-चिंचवडकर रामभक्तांनी सहभागी होत महाराष्ट्रातील सर्वात मोठी रथयात्रा यशस्वी केली. राम जन्मभूमी अयोध्येतील श्रीराम मंदिर राष्ट्रार्पण व मूर्ती प्राणप्रतिष्ठानिमित्त पिंपरी-चिंचवडमध्ये हिंदूत्ववादी आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने भव्य 'रथयात्रा' आयोजित केली होती. त्याला रामभक्त, हिंदू बांधवांनी प्रचंड प्रतिसाद दिला.




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अयोध्या येथील प्रभू श्रीराम मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठा झाली. त्यासाठी देशभरामध्ये उत्सवाचे आणि आनंदाचे वातावरण आहे. पिंपरी- चिंचवडमध्येही गेल्या सात दिवसांपासून आमदार लांडगे यांनी विविध धार्मिक, अध्यात्मिक, सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन केले आहे. निगडी येथील भक्ती-शक्ती चौक येथून रथ यात्रेला सुरूवात झाली. हजारो दुचाकी व चारचाकी, चार विजयरथ, राम मंदिर प्रतिकृती, मदार्नी खेळ, डी.जे. ढोल पथक, झांज पथक, श्रीराम जिवंत देखावा, गंगा आरती, सनई चौघडे, महाबली हनुमान, कलश यात्रा, आतिषबाजी यांसह हिंदू धमार्बाबत जागृती करण्यासाठी विविध देखावे सादर करण्यात आले.

## सेल्फी काढणाऱ्या दोन बहिणींना वाचविण्याच्या प्रयत्नात भाऊ पानशेत धरणात बुडाला

■पुणे। प्रतिनिधी,

पानशेत धरणातील सांडव्यावर थांबून सेल्फी काढणाऱ्या दोन बहिणी पाण्यात पडल्या. त्यांना वाचविण्याच्या प्रयत्नात भावाचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. ज्ञानेश्वर बालाजी मनाळे (वय १८ रा. खराडी) असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. स्थानिक रहिवाशांनी तातडीने बचावकार्य सुरू केल्याने अनुसया बालाजी मनाळे आणि तिची बहीण मयुरी बचावल्या, अशी माहिती वेल्हे पोलिसांनी दिली. ज्ञानेश्वर आणि त्याची बहीण अनुसया, मयुरी, तसेच मित्र-मैत्रिणींसोबत रविवारी पानशेत धरण परिसरात फिरायला आला होता. दुपारी तीनच्या सुमारास ज्ञानेश्वरसह मित्र-मैत्रिणी दुचाकीवरुन घरी निघाले.

पानशेत धरणाच्या वीज निर्मिती केंद्राच्या परिसरातील पुलावरून ते निघाले होते. त्यावेळी धरणातील सांडव्यावर



सर्वजण उतरले. पाण्यात उभे राहून अनुसया आणि मयुरी मोबाइलवर छायाचित्रे काढत होत्या. त्यावेळी अनुसयाचा पाय घसरला आणि ती पाण्यात पडली. पाण्याला वेग असल्याने ती वाहून जात होती. तिला वाचविण्यासाठी मयुरी पाण्यात उतरली. पाण्याला वेग असल्याने मयुरी बुडाली. अनुसया आणि मयुरीला वाचविण्यासाठी भाऊ ज्ञानेश्वरने पाण्यात उतरला पाण्याला वेग असल्याने ज्ञानेश्वर बुडाला.

## संरक्षक भिंतीच्या तारांमध्ये अडकलेल्या बिबट्याची मुक्तता



■नाशिक। प्रतिनिधी,

दिंडोरी तालुक्यातील शिवनई येथील केंद्रीय संरक्षण विभागाच्या प्रकल्पाच्या संरक्षक भिंतीच्या तारांमध्ये शिकारीसह अडकलेल्या बिबट्याची वन विभागाने मुक्तता केली. सोमवारी सकाळी सात वाजेच्या सुमारास शिवनई गावालगत असणाऱ्या खंडेराव मंदिरानजीक हा प्रकार घडला. संरक्षण विभागाच्या अखत्यारीतील प्रकल्पाच्या संरक्षक भिंतीत तारांचाही समावेश आहे.


बिबट्या कुत्र्याची शिकार घेऊन जात असताना त्यामध्ये अडकला. परिसरातील शेतकऱ्यांना ही बाब लक्षात आल्यावर त्यांनी या घटनेची माहिती वन विभागाला दिली. दिंडोरीचे विभागाचे वनपाल अशोक काळे व कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तारेत अडकलेल्या बिबट्याला सोडविण्यासाठी पथकाने त्याला गुंगीचे इंजेक्शन दिले.

बिबट्या बेशुध्द पडल्यानंतर त्याची तारेतून सुटका करण्यात आली. हा बिबट्या तीन वर्षे वयाची मादी असल्याचे वन विभागाने म्हटले आहे. बिबट्याला अधिक उपचारासाठी नाशिक येथील निवारा केंद्रात हलविण्यात आल्याची माहिती वन अधिकारी अधिकारी काळे यांनी दिली आहे.

## सिकलसेलच्या रुग्णांमध्ये तीन वर्षांत मोठी वाढ!

■मुंबई। प्रतिनिधी,

महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांत सिकलसेल अनिमिया या अनुवांशिक आजाराच्या रुग्णांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. केंद्र शासनाने मागील वर्षीपासून देशभरात सिकलसेल ॲनिमिया निर्मूलन मोहिमेला सुरुवात केली असून या अंतर्गत आतापर्यंत सुमारे दीड कोटी लोकांची तपासणी करण्यात आली आहे. मात्र महाराष्ट्रात ज्या गतीने याबाबत आरोग्य तपासणी होणे अपेक्षित आहे तेवढी होत नसल्याचे एकीकडे दिसून येते. तर दुसरीकडे रुग्णांच्या संख्येत लक्षणीय लाढ झाली आहे. सिकलसेल ॲनिमियाच्या रुग्णांची स्थिती ही 'ना जगू देतो ना मरू देतो' अशी आहे.



आई-वडिलांकडून म्हणजेच अनुवांशिक संक्रमित होणारा हा आजार आहे. केंद्र शासनाने २०२३ च्या अर्थसंकल्पात सिकलसेल निर्मूलनाचे धोरण जाहीर केले असून २०४७ पर्यंत देशातून या आजाराचे उच्चाटन करण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. महाराष्ट्रात गेल्या तीन वर्षात या आजाराचे रुग्ण व वाहाकांची संख्या वाढत असल्याचे दिसून आले असून त्या तुलनेत चाचण्याची संख्या वेगाने होणे आवश्यक असल्याचे आरोग्य विभागाच्याच डॉक्टरांचे म्हणणे आहे. आरोग्य विभागाने राज्यात २०२०-२१ मध्ये सात लाख ६५ हजार १४१ सोल्युबिलिटी चाचण्या केल्या होत्या यात ३४४ रुग्ण आढळून आले तर ६,१०५ वाहक निदर्शनाला आले. २०२१-२२ मध्ये नऊ लाख ५३ हजार ९९० सोल्युबिलीटी चाचण्या करण्यात आल्या असून यात ९३३ रुग्ण आढळले तर १०,२३७ वाहक असल्याचे आढळून आले. २०२२-२३ मध्ये आठ लाख ८२ हजार ८७३ चाचण्या करण्यात येऊन त्यात १८३८ रुग्ण व १५,७२० वाहक आढळून आले.

सिकलसेल ॲनिमियाचे २०४७ पर्यंत उच्चाटन करण्यासाठी आगामी काळात तीन वर्षांमध्ये ४० वर्षे वयापर्यंतच्या जवळपास सात कोटी आदिवासींची रक्त तपासणी करण्यात येणार आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकार एकत्रितपणे सिकलसेल निर्मूलनाचा कार्यक्रम आखल्याचे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारमन यांनी जाहीर केले होते. प्रामुख्याने हा आजार आदिवासी भागातच आढळतो. २०११ च्या जनगणनेनुसार भारतात सहा कोटी ७८ लाख आदिवासी आहेत. केंद्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या मते प्रत्येक ८६ व्या आदिवासी व्यक्तीमागे सिकलसेल आजाराचा एक रुग्ण सापडतो. गुजरात, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, झारखंड, छत्तीसगढ, पश्चिम बंगाल, ओडिसा, तामिळनाडू, कर्नाटक, आसाम, उत्तर प्रदेश, बिहार, केरळ आणि उत्तराखंड आदी राज्यात मोठ्या प्रमाणावर सिकलसेलचे रुग्ण आहेत. देशातील २७८ जिल्ह्यांवर लक्ष केंद्रित करून या आजाराचे उच्चाटन करण्यावर भर देण्यात आला आहे. यात मोठ्या प्रमाणात सिकलसेल आजाराची तपासणी तसेच विवाहपूर्व आणि गर्भधारणेच्या काळात समुपदेशन केले जाणार आहे.

## मॅरेथॉनमध्ये दोघांचा मृत्यू

■ मुंबई। प्रतिनिधी,



मुंबई मॅरेथॉनमध्ये धावताना दोन धावपटूंचा मृत्यू झाला तर २२ धावपटूंना रुग्णालयात दाखल करावे लागले. सुब्रदीप बॅनर्जी (४०) आणि राजेंद्र बोरा (७४) अशी मृत्यू झालेल्या धावपटूंची नावे आहेत. धावत असताना अचानक ते कोसळले. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र त्यांचा मृत्यू झाला. मुंबई मॅरेथॉनच्या पूर्ण मॅरेथॉनमध्ये सहभागी झालेले कोलकाताचे सुब्रदीप बॅनर्जी (४०) हे धावत असताना हाजी अली जंक्शनजवळ कोसळले. पोलिसांनी त्यांना तातडीने नायर रुग्णालयात हलविले. मात्र रुग्णालयात नेण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. बॅनर्जी हे धावताना कोसळल्याने त्यांच्या कपाळाच्या डाव्या बाजूला दुखापत होऊन रक्तस्त्राव झाला होता, तसेच त्यांच्या डाव्या गुडघ्याला मार लागला होता. बॅनर्जी यांचा सकाळी ८.३० वाजता मृत्यू झाल्याची माहिती नायर रुग्णालयाकडून देण्यात आली. तसेच नरिमन पॉईंट परिसरामध्ये राजेंद्र बोरा (७४) हे कोसळलेल्या अवस्थेत आढळले. त्यांच्यावर मुंबई मॅरेथॉनचे वैद्यकीय सहभागी असलेल्या एशियन हार्ट इन्स्टिटयूटच्या डॉक्टरांकडून उपचार करण्यात आले. त्यांना सीपीआर देण्याचा प्रयत्न केला. मात्र ते प्रतिसाद देत नसल्याने त्यांना तातडीने बॉम्बे रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र त्यांनी उपचाराला कोणताही प्रतिसाद दिला नसल्याची माहिती एशियन हार्ट इन्स्टिटयूटचे क्रिटिकल केअरचे संचालक डॉ. विजय डिसिल्वा यांनी सांगितले.

## आरोग्य विभाग खरेदी करणार सर्व तालुक्यांसाठी ३५२ शववाहिका!



■मुंबई। प्रतिनिधी,

राज्याच्या ग्रामीण भागात मृतदेह रुग्णालयापासून घरापर्यंत तसेच स्मशानभूमीपर्यंत नेण्यासाठी पुरेशा शववाहिका नसल्यामुळे नातेवाईकांचे होणारे हाल लक्षात घेऊन आरोग्य विभागाने राज्यातील प्रत्येक तालुक्यासाठी एक शववाहिका खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रामुख्याने ग्रामीण भागात तालुका पातळीवर होणारे नातेवाईकांचे हाल लक्षात घेऊन आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी आरोग्य विभागाच्या माध्यमातून हा निर्णय घेतला आहे.

राज्यातील महापालिका क्षेत्रांमध्ये महापालिकेच्या शववाहिन्या असतात तसेच मोठ्या प्रमाणात खाजगी शववाहिन्याही उपलब्ध असतात. महापालिका क्षेत्रात तसेच शहरी भागात पालिका रुग्णालये, शासकीय वा खाजगी रुग्णालयात रुग्णाचा मृत्यू झाल्यास रुग्णालये ते घर वा स्मशानभूमीपर्यंत मृतदेह वाहून नेण्यासाठी मोठ्या प्रमाणात मोफत तसेच पैसे भरून शववाहिन्या उपलब्ध होतात. मात्र याच्या उलट परिस्थिती ग्रामीण भागात दिसते. प्रामुख्याने करोना काळात मोठ्या प्रमाणात मृत्यू होत असताना मृतदेह वाहून नेण्यासाठी पुरेशी व्यवस्था नसल्यामुळे लोकांचे मोठ्या प्रमाणात हाल झाले होते. आजही ग्रामीण भागात एखाद्या व्यक्तीचा रुग्णालयात मृत्यू झाल्यास मृतदेह खाजगी जीप वा बैलगाडीमधून न्यावा लागत असल्याचे चित्र आहे. ग्रामीण भागात मृतदेह वाहून नेण्यासाठी फारशी व्यवस्था नसल्यामुळे लोकांचे होणारे हाल लक्षात घेऊन आरोग्य विभागाने याबाबत पुढाकार घेऊन व्यवस्था करावी, अशी मागणी वेळोवेळी विधिमंडळाच्या अधिवेशनातही करण्यात आली आहे.

राज्यातील २५ महापालिका क्षेत्रात काही प्रमाणात मृतदेह वाहून नेण्यासाठी व्यवस्था आहे. मात्र तालुकास्तरावर तसेच आदिवासी भागात लोकांचे मोठ्या प्रमाणात हाल होत असल्याचे लक्षात घेऊन आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी अलीकडेच याबाबत आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांची एक बैठक घेतली. तसेच ग्रामीण भागातील लोकप्रतिनिधींशी चर्चा केली. यानंतर प्रत्येक तालुक्यासाठी एक शववाहिनी घेण्याचा निर्णय आरोग्यमंत्र्यांनी घेतला.

## राम मंदिरासाठी वडिलांनी लाठ्या खाल्ल्या, रोहिणी खडसे यांचा दावा

■नाशिक। प्रतिनिधी,

अयोध्येत होणारे राम मंदिर हा सर्व हिंदूचा श्रद्धेचा विषय आहे. या मंदिरासाठी माझ्या वडिलांनी लाठ्या खाल्ल्या आहेत. भाजपकडून मंदिरातील मूर्ती प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमास एखाद्या सोहळ्यासारखे स्वरूप दिले गेले असून ते चुकीचे असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी सांगितले. सक्तवसुली संचनालयाकडून विरोधी पक्षातील नेत्यांना बजावल्या जाणाऱ्या नोटीस हा भाजपच्या दबाव तंत्राचा भाग असल्याचा आरोप त्यांनी केला.

प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती झाल्यानंतर खडसे सध्या राज्य



दौऱ्यावर आहेत. शनिवारी नाशिक येथे त्यांनी महिला पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी नव्याने नियुक्त करण्यात आलेल्या पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र खडसे यांच्या हस्ते देण्यात आले. पत्रकारांशी संवाद साधताना खडसे यांनी विविध मुद्यांकडे लक्ष वेधले.

अयोध्येत मंदिर अपूर्ण असताना मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होत असून हे चुकीचे आहे. प्राणप्रतिष्ठा कार्यक्रम निमंत्रितांसाठी असून ही गर्दी कमी झाल्यानंतर नक्की दर्शनाला जाईल, असे खडसे यांनी सांगितले. वंचित बहुजन आघाडीशी युतीविषयी वरिष्ठ पातळीवर चर्चा सुरू आहे. बैठकीत निर्णय होईल. यानंतर चित्र स्पष्ट होईल. सध्या सक्तवसुली संचनालयाकडून (ईडी) विरोधी पक्षातील नेत्यांना नोटीस बजावल्या जात आहेत. हे दबावतंत्र आहे.

भाजप ज्यांच्या विरोधात बोलतो, त्याला ईडीची नोटीस बजावली जाते. मग ती व्यक्ती भाजपमध्ये गेली की शुद्ध होऊन जाते, असा टोला त्यांनी लगावला. शिवसेनेतील आमदार अपात्रतेच्या निकालावरून राष्ट्रवादी कोणाची, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.